**प्रस्तावाचा विषय :-**"कोरोना विषाणु (COVID-19) नैसर्गिक आपत्ति आपत्तकालीन व्यवस्था" वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील सर डि.एम. पेटीट रुग्णालयात सोनोग्राफी व ओ.टी. (शल्य चिकित्सा) विभागा मध्ये विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविणे कामास संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रभाग समिति "आय " अंतर्गत सर डी.एम.पेटीट रुग्णालयातिल सोनोग्राफी व ओ.टी. (शल्य चिकित्सा) विभागामध्ये बांधकाम विभागा मार्फत नुतनीकरणा चे काम करण्यात आले आहे. नूतनीकरण करते वेळी विद्युतीय साहित्यच्या नूतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच रुग्णालया मध्ये आपत्कालीन परिस्थिति उदभवल्यास रुग्णांना व हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित रित्या बाहेर निघण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. याकरिता, महानगरपालिका प्रभाग समिति "आय" कार्यक्षेत्रातील मालिकेचे सर डी.एम. पेटीट रुग्णालयातिल सोनोग्राफी व ओ.टी. विभागामध्ये बांधकाम विभागा मार्फत नुतनीकरणा चे काम करण्यात आले आहे त्या साठी विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविणे बसविण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.उपायोजना करणेकरिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिति (आय) कार्याशेत्रातील सर डी.एम. पेटीट रुग्णालयातिल सोनोग्राफी व ओ.टी. .(शल्य चिकित्सा) विभागामध्ये विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविणे चे काम करण्यात येत आहे .

सदर रुग्णालयातिल सोनोग्राफी व ओ.टी. (शल्य चिकित्सा) विभागात नुतनीकरणा चे काम करण्यात आले आहे त्या साठी व्यवस्था करणे गरजे चे आहे.

या करिता, सदर इमारतीत खालील नमुद केलेप्रमाणे विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविण्याची त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

याकरिता, सदर इमारतीत खालील नमुद केलेप्रमाणे विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविण्याची कामे करणे करिता संदर्भिय क्र.2 अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | **वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" सर डि.एम. पेटीट रुग्णालयात** | मोडूलर स्विच ५ A.-२१ नग,मोडूलर सोकेट ५ A.-२१ नग, मोडूलर स्विच १५ A.-१२ नग,मोडूलर सोकेट १५ A.-१३ नग, मॉडयुलर बॉक्स-३२ नग,वा पॉईंट वायरींग-१२ नग,LED पॅनल १५ W- ३० नग, LED | मे. कींजल ईलेक्ट्रिकल्स |

| | | | |
|---|---|---|---|
| | **सोनोग्राफी व ओ.टी. ( शल्य चिकित्सा) विभागामध्ये विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविणे** | ट्यूबलाइट २० Wनग ८८ - ,LED फ्लड लाइट ५० Wनग ८ -, सिलिंग फॅन 1200mm-२९ नग, वातानुकुलित यंत्रणा 1.5 टन-४ नग,इन्व्हर्टर 2500VA- २ नग, बॅटरी 200 AH- ४ नग,स्टेबिलाईजर 4 kVaनग ४- , स्टेबिलाईजर 5kVaनग २- , SPMCB-२५ नग,FPMCB ३- नग,TPNDB-३ नग,4x4 sq.mm कॉपर केबल -२८० मी,FRP बॉक्सनग १० -,रबर मेटिंग १२ -sq.mtr.अंदाजपत्रकीय रक्कम - 9,85,485/- | |

उपरोक्त कामांचे सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10, 00, 00, 000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

वर नमुद केलेल्या बाबीनुसार येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा. आयुक्त सो., यांनी दि. /04/2021 रोजीचे ठराव क्र. अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे. परंतु, सद्यस्थितीत कोरोना (कोविड-19) विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल.

"वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील सर डि.एम. पेटीट रुग्णालयात सोनोग्राफी व ओ.टी. (शल्य चिकित्सा) विभागा मध्ये विध्युतीकरण करणे व आपत्कालीन विद्युत यंत्रणा बसविणे ची कामे करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे. कींजल ईलेक्ट्रिकल्स** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर **10% कमी दराने** काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा पशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. २८७

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२५ /०६ /2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- "कोरोना विषाणु (कोविड-19) आपत्तकालीन व्यवस्था"
वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथील अति दक्षता विभागात (ICU) नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंची संभाव्य तिसरी लाट आणि कोरोनाचा उत्परिवर्तित विषाणुंचा धोका (डेल्टा प्लस) यांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन आले आहे आणि त्यामुळे संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार वरुण इंडस्ट्री येथे उभारण्यात आलेले कोरोना केअर सेंटर रुग्णालयमध्ये अति दक्षता विभाग (ICU) उभारण्यात येणार आहे. तसेच, सदर अति दक्षता विभाग (ICU) करिता ऑक्सिजन प्लांट देखिल उभारण्यात आले आहे.

याकरिता, सदर अति दक्षता विभाग (ICU) व ऑक्सिजन प्लांट करिता विद्युत विभागामार्फत तातडीने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा ठेवणे करीता डिझेल जनित्र व त्या अनुषांगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने विद्युतीय कामे करणे. | **अति दक्षता विभाग (ICU Section)**<br>**पार्ट-1 (वॉशिंग मशिन कंट्रोल पॅनल व मिनी फिडर पिलर) :-** CRCA शिट बॉक्स-8 नग, 3 पोल MCCB 100A-2 नग, FPMCB 100A-6 नग, ॲनल्ड बेअर कॉपर वायर-10 कि.गॅ, 20 वॅट LED टयुबलाईट-5 नग, पॉईंट वायरींग फॉर PVC-5 पॉईंट, पॉईंट वायरींग फॉर इंडिपेंन्डेन्ट प्लग-15 पॉईंट, मॉडयुलर स्विच बॉक्स-7 नग, स्विच सॉकेट-12 पॉईंट, 2 x2.5 स्क्वे.एम. एम कॉपर वायर-110 मी, 1.5 टन वातानुकुलित यंत्राणा-2 नग, कॉपर पाईप-10 मी, कन्डयुट - 10 मी, मिनी फिडर पिलर-6 नग, एक्सेवेशन हार्ड रॉक-31 मी, फाऊंडेशन-3 नग,<br>**पार्ट-2 (सिटी मिटर पॅनल) :-** 4 x240 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-330 मी, 4 x150 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-160 मी, 3 x35 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-80 मी , 4 x10 स्क्वे.एम. एम कॉपर कंडक्टर-18 मी, RCC हयुम पाईप-550 मी.<br>**पार्ट-3 (अर्थिंग):-** बोरींग/ड्रिलींग बोअर वेल - 156 मी, अर्थिंग - 26 नग, जी.आय स्ट्रीप - 780 कि.ग्रॅ, आर.सी.सी चेंबर कव्हर - 26 नग | 23,47,955/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने अखंडीत विज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था करणे. | **डिझेल जनित्र**<br>250 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग | 20,59,895/- |
| 3 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने सिटी मिटर पॅनल, चेंज ओव्हर पॅनल, डिस्ट्रीब्युशन पॅनल व्यवस्था करणे | **पॉवर सेक्शन (Power Section)**<br>**सिटी मिटर पॅनल, चेंज ओव्हर पॅनल, डिस्ट्रीब्युशन पॅनल**<br>**पार्ट-1 (चेंज ओव्हर पॅनल) :-** जी.आय शिट-15.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-490 कि.गॅ, लॉक-30 नग, 2x10 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-90 मी, 2x6 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-90 मी, लग्ज-70 नग, पॅनल मिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-1 नग, पायलेट लॅम्प-6 नग, न्युटरल लिंक-4 नग, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-70 नग, बस पट्टी व बार-168 कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-4 नग, 3 पोल MCCB 630A- 2 नग, 3 पोल MCCB 400A- 2 नग, रोट्री हॅन्डल 250A-2 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-2 सेट.<br>**पार्ट-2 (आय.सी.यु डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-** जी.आय शिट-14.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-270 कि.गॅ, 4x16 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-240 मी, 4x50 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-240 मी, पायलेट लॅम्प-18 नग, बस पट्टी व बार-72 कि.ग्रॅ, 3 पोल MCCB 200A- 6 नग, FPMCB 40A ते 63A, टर्मिनल स्प्रेडर-6 सेट<br>**पार्ट-3 (ICU रुम आऊटसाईड पॅनल):-** जी.आय शिट-10.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-288 कि.गॅ, लॉक-24 नग, 2x10 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-290 मी, रोट्री हॅन्डल-24 नग, टर्मिनल स्प्रेडर-24 सेट, SPMCB- 6 ते 32A सी सिरीज-114 नग, SPMCB- 6 ते 32A बी सिरीज-114 नग, 4 पोल RCCB-48 नग,<br>**पार्ट-4 (सिटी मिटर पॅनल):-** जी.आय शिट-11 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.गॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेडर-1 सेट, 3 पोल MCCB 600A- 1 नग,<br>**पार्ट-5 (पॉईंट वायरींग):-**पॉईंट वायरींग-160 पॉईंट, पॉईंट वायरींग फॉर इंडिपेंडेंट प्लग-30 पॉईंट, वायरींग फॉर प्लग ऑन बोर्ड-160 पॉईंट, 20 वॅट LED टयुब लाईट-80 नग, मॉडयुलर | 40,36,116/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्विच बॉक्स-80 नग, एअर सक्युलेटर-70 नग, SPMCB-6A ते 32A-110 नग<br>**पार्ट-6 (केबलिंग वर्क)** 3x4sq.mmआर्मड केबल-1280 मी, 4x6sq.mmआर्मड केबल-1450 मी, 4x25sq.mmआर्मड केबल-380 मी, 4x10sq.mmआर्मड केबल-320 मी | |
| 4 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने वातानुकुलित यंत्रणा बसविणें | **वातानुकुलित यंत्रणा**<br>2 टन वातानुकुलित यंत्रणा-30 नग, व्होल्टेज स्टॅबिलायझर-30 नग, सॉफ्ट ड्रोन कॉपर पाईप-960 मी, UPVC फ्रलॅक्झीबल कंडयुट-960 मी. | 35,21,145/- |

"आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने वर नमुद केलेली कामे तातडीने करणे आवश्यक आहे. याकामी सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार वर नमुद केलेप्रमाणे अंदाजपत्रके बनविणेत आले असुन अनुक्रमांक 1 ते 4 कामांकरिता एकुण रक्कम 1,19,65,111/- रुपये खर्च अपेक्षित राहील.

सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथील अति दक्षता विभागात (ICU) नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिताअनुक्रमांक 1 ते 4 कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 1,19,65,111/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८८

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२५/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती व मुख्यालयाकरिता पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती कार्यालये असून दैनंदिन कामकाजासाठी प्रत्येक प्रभाग निहाय बोलेरो यूटीलीटी जीप वाहन दिलेले आहे. सदर वाहानाचा वापर अतिक्रमण, घरपट्टी, पाणीपट्टी वसूली दवंडी देणे व इतर शासकीय कामकाजासाठी करण्यात येते. याकामी वाहानावर दवंडी देणेकामी पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा बसवल्यास त्याचा वापर महापालिकेच्या सर्व प्रकारच्या सुचना नागरीकांना देण्यासाठी होईल. याबाबत प्रभाग समिती स्तरावरुन ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्याबाबत वारंवार तोंडी मागणी येत आहे. त्याकरीता खालील तपशिलाप्रमाणे अहुजा कंपनीची ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविणे योग्य होईल. सदरची यंत्रणा पोलीस विभागाच्या वाहनांवरही कार्यरत असते व ते वेळोवेळी त्याचा वापर करत असतात.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | प्रति नग दर | आवश्यक नग | एकुण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 2. | Mobile P A Amplifier with Horn Speaker 25 x T, Mice Beta 58 A Ahuja Company with Full Carrier Stainless Steel Stand 5 ft with fitting & Wiring Ahuja company full set. | प्रति नग १८५०० +१८% जी.एस.टी. (३३३०/-) एकूण २१८३०/- | ०९ नग | २,००,०००/- |

तरी महानगरपालिकेच्या ९ प्रभाग कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ९ बोलेरो युटीलीटी वाहनांवर उपरोक्त यंत्रणा बसविणेस व त्याद्वारे विविध कामाच्या सुचना देणेकामी दरपत्रके मागवून येणाऱ्या रक्कम रु. २ लक्ष खर्चास मान्यता देणेकामी मंजुरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालयाकरिता दैनंदिन कामकाजासाठी प्रत्येक प्रभाग निहाय बोलेरो युटीलीटी जीप वाहन दिलेली आहे. सदर वाहनांवर अतिक्रमण, घरपट्टी, पाणीपट्टी वसूली दंवडी देणे व इतर शासकीय कामकाजासाठी महापालिकेच्या सर्व प्रकारच्या सुचना नागरिकांना देण्यासाठी पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा खरेदी खरेदीकामी ठराव क्र. १०५ दि. ०६/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिल्यानूसार दरपत्रक प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. त्यामध्ये मे. साक्षी इंटरप्रायझेस यांचे तुलनात्मक दर कमी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानूसार मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८९

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२५/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन प्राप्त होणाऱ्या चलनी नोटा नकली नोटा तपासून मोजदाद करणेकामी प्रिसिजन कंपनीचे कांऊटींग मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये असून त्या अंतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये मालमत्ता कर , पाणीपट्टी वसूली करण्यात येते. याकामी दैनंदिन प्राप्त होणाऱ्या चलनी नोटा नकली नोटा येत असतात व बँकेकडे भरणा करताना नकली नोटा सापडल्या जातात. अश्यावेळी कर्मचाऱ्यांना स्वत:कडील रक्कम चलनी नकली नोटांची रक्कम भरपाई करावी लागते. याकामी प्रभाग समिती कार्यालयाकडून नोटा मोजण्याचे मशिनची मागणी करण्यांत येत आहे. त्याकरीता खालील तपशीलाप्रमाणे नमुद केलेले चलनी नोटा मोजण्याचे मशिन खरेदी करुन विभागांना दिल्यास भरणा करतेवेळी नोट तपासून घेणे सोयीस्कर होईल. सध्या शहरामध्ये २५ ठिकाणी वसुलीचे कामकाज करण्यात येत असून त्यापैकी मोठ्या प्रमाणावर वसुली होणाऱ्या १८ ठिकाणांवर सदर मशिन उपलब्ध करुन देण्यास प्रति मशिन रक्कम रु. १६,०००/-(जी.एस.टी.सह) प्रमाणे रक्कम रु ३ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | तपशिल | खरेदी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रिसिजन कंपनीचे मॉडेल क्र.INV-१२० MIX VALUE COUNTER मशिन | १८ |

तरी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये इत्यादी ठिकाणी दैनंदिन कामकाजामध्ये मालमत्ता कर, पाणीपट्टी वसूली करण्याकरीता उपरोक्त तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे १८ नग मशिन दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३ लक्ष पर्यंतचे खर्चास मान्यता देणेकामी मंजूरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये इ. ठिकाणी दैनंदिन मालमत्ता कर, पाणीपट्टी वसूली करण्याकरिता प्रिसिजन कंपनीचे कांऊटींग मशिन खरेदीकामी ठराव क्र. १०६ दि. ०६/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिल्यानूसार दरपत्रक प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. त्यामध्ये मे. एच.एम.पी. इंटरप्रायझेस यांचे प्राप्त दर कमी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानूसार मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८०

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२५/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका मालमत्ता कराची दैनंदिन वसुली रोकड रक्कम ठेवण्यासाठी गोदरेज कंपनीचे तिजोरी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ता कराची दैनंदिन वसूली ९ प्रभाग कार्यालयाचे ठिकाणी करण्यांत येते. तसेच काही प्रभागा अंतर्गत असलेल्या विभागीय कार्यालय अंतर्गत करण्यांत येते. सद्या अशी २५ ठिकाणी वसुली कार्यरत आहे.

घरपट्टी व पाणीपट्टी वसूलीचे काऊंटर दिवसभर कार्यरत असतात अश्या वेळी रोकड ठेवणे ती हाताळणे या कामासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने टेबलामधील ड्रॉव्हरमध्ये रोकड ठेवणे अडचणीचे होते. तसेच काही कार्यालया मधील रोकड दुसऱ्या दिवशी अथवा जोडून सुटया आल्यास दुसऱ्या अथवा तीसऱ्या दिवशी बँकेत जमा करावी लागते.

सदरची रक्कम ठेवणे जोखमीचे असून त्याकरिता गोदरेज कंपनीचे खालील मॉडेलची तिजोरी खरेदी करणे योग्य होईल.

| अ.क्र | तपशिल | उंची | रुंदी | खोली | वजन | अंदाजी किमंत | आवश्यक नग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोदरेज कंपनीची तिजोरी मॉडेल :- कवच | १८.५० इंच | १९.२० इंच | १६.४० इंच | ७० किलो | ३०,०००/- | ५ नग |
| २ | गोदरेज कंपनीची तिजोरी मॉडेल :- सिताडेल ४५ | १९ इंच | १९ इंच | १७.५ इंच | ५५ किलो | २५,०००/- | ६ नग |

तरी महानगरपालिका हद्दीतील कार्यक्षेत्रामध्ये ९ प्रभाग कार्यालय ठिकाणी मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूल केलेली रक्कम ठेवण्यासाठी दरपत्रके मागविण्याकामी कार्यवाही करण्यात आली. या केलेल्या कार्यवाहीस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३ लक्ष/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेकामी मंजूरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :-** मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूल केलेली रक्कम ठेवण्यासाठी गोदरेज तिजोरी खरेदी करणेकामी ३ लक्ष खर्चास ठराव क्र. ४७० दिनांक १०/०२/२०२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिल्यानूसार दरपत्रक प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे. त्यामध्ये **मे. साक्षी इंटरप्रायझेस** यांना तिजोरी पुरवठा करणेकामी रक्कम रु. २,९५,०८९/- केलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. 291

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- 25/06/2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- "कोरोना विषाणु (कोविड-19) आपत्तकालीन व्यवस्था"

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र 630 के.व्ही.ए क्षमतेचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर** :- सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंची संभाव्य तिसरी लाट आणि कोरोनाचा उत्परिवर्तित विषाणुंचा धोका (डेल्टा प्लस) यांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन आले आहे आणि त्यामुळे संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याकरिता वरुण इंडस्ट्री येथील कोरोना केअर रुग्णालयात विलगिकरण कक्ष, अति दक्षता विभाग (ICU), फार्मसी विभाग, लॅब टेस्ट्रींग विभाग, मृत शरीर ठेवणेंकरिता शवपेटी व अतिदक्ष रुग्णांकरिता स्वतंत्र ऑक्सिजन जनरेटर प्लांट इत्यादींची उभारणी करणेंत आले आहे.

भविष्यात कोविड-19 ची तिसरी लाट लक्षात घेता, सदर रुग्णालयाच्या इमारतीत ऑक्सिजन जनरेटर प्लांट व अति दक्षता विभाग (ICU) कक्षाचे विस्तार करावयाचे आहेत. परिणामी वीज भार त्यामुळे वाढणार आहे. भविष्यात ऑक्सिजन जनरेटर प्लांट, अति दक्षता विभाग (ICU) व त्याअनुषंगिक वैद्यकिय उपकरणे इ. मुळे 400 कि.वॅट लोड वाढणार असल्याने 630 के.व्ही.ए क्षमतेचा आऊटडोअर पध्दतीचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) वरुण इंडस्ट्री, गोलानी नाका येथील कोरोना केअर सेंटर येथे बसविणे आवश्यक आहे.

याकरिता सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेंत आले असुन, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहीत्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणें. | **630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहीत्र बसविणें कामी सार्वजनिक बांधकाम विद्युत जिल्हा दरसुची नुसार खर्च**<br>**पार्ट-1 (ट्रान्सफॉर्मर) :-** 3 फेज 11/0.43kV,50Hz, 630 kVA ट्रान्सफॉर्मर - 1 नग, 152 x152mm रोल स्टील जॉईस्ट पोल-26 मी, 100 x116mm रोल स्टील जॉईस्ट पोल-22 मी, फाऊंडेशन-4 नग, 4.7mm थीक वेब आणि 7.5mm थीक फ्रलेंज चॅनल-50 नग, पोल ब्रॅकेट-40 सेट, पोल क्लॅम्प-40 नग, 22kV गेज ऑपरेटेड एअर ब्रेक-1 नग, पॉक्लेन पिन टाईप इन्शुलेटर-9 नग, 22kV थ्रेट टाईप लाईटनिंग अरेस्टर-1 नग, पॉक्लेन डिस्क् टाईप इन्शुलेटर-6 नग, पाईप टाईप अर्थिंग 8 नग, ACSR कंडक्टर-0.5 km, 31/2 x95sq.mm आर्मड केबल-86 मी, जॉईंट किट-1 नग, आऊट डोअर टर्मिनेशन किट-2 नग, 31/2 x300sq.mm आर्मड केबल-50 मी, मिनि फिडर पिलर-1 नग | 25,04,493/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र बसविणें कामाचे 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्जेस) भरणा करणे. | **पार्ट-2** (1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्जेस) | 32,559/- |
| 3 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र सि.टी वीज मिटर करिता वीज कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम भरणा करणे. | **पार्ट-2 (वीज कनेक्शन व अनामत रक्कम)** :- ऑक्सिजन प्लांट 200 कि.वॅट व अति दक्षता विभाग (ICU) 200 कि.वॅट एकुण 400 कि.वॅट सि.टी मिटर वीज भार व अनामत रक्कम | 6,00,000/- |

"वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने वर नमुद केलेले काम तातडीने करणे आवश्यक आहे. याकामी सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार वर नमुद केलेप्रमाणे काम क्र.1 करीता रक्कम 25,04,493/- रुपये, काम क्र.2 करीता रक्कम 32,559/- रुपये व काम क्र.3 करीता रक्कम 6,00,000/- रुपये असा एकुण रक्कम 31,37,052/- रुपये खर्च अपेक्षित राहणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंत येतो. याकरिता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडुन 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) मंजुर करुन घेणे करिता वीज वितरण कंपनी सोबत पत्रव्यवहार करणे आवश्यक राहील. याकामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील **"नैसर्गिक आपत्ती इतर"** या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंकरिता आवश्यक 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणें कामी आवश्यक पत्रव्यवहार करणे व त्याकामी येणाऱ्या रक्कम 31,37,052/- रुपये खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत वीज पुरवठा करणेंकरिता आवश्यक 630 के.व्हीए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणें कामी आवश्यक पत्रव्यवहार करणे व त्याकामी येणाऱ्या कामी येणाऱ्या रक्कम 31,37,052/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. २९२ | विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- २८/०९/2021

---

**प्रस्तावाचा विषय :-** "कोरोना विषाणु (कोविड-19) आपत्तकालीन व्यवस्था"
वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथील अति दक्षता विभागात (ICU) नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामास संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर** :- सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंची संभाव्य तिसरी लाट आणि कोरोनाचा उत्परिवर्तित विषाणुंचा धोका (डेल्टा प्लस) यांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन आले आहे आणि त्यामुळे संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार वरुण इंडस्ट्री येथे उभारण्यात आलेले कोरोना केअर सेंटर रुग्णालयमध्ये अति दक्षता विभाग (ICU) उभारण्यात येणार आहे. तसेच, सदर अति दक्षता विभाग (ICU) करिता ऑक्सिजन प्लांट देखिल उभारण्यात आले आहे.

याकरिता, सदर अति दक्षता विभाग (ICU) व ऑक्सिजन प्लांट करिता विद्युत विभागामार्फत तातडीने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा ठेवणे करीता डिझेल जनित्र व त्या अनुषांगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप / अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने विद्युतीय कामे करणे. | **अति दक्षता विभाग (ICU Section)**<br>**पार्ट-1 (वॉशिंग मशिन कंट्रोल पॅनल व मिनी फिडर पिलर) :-** CRCA शिट बॉक्स-8 नग, 3 पोल MCCB 100A-2 नग, FPMCB 100A-6 नग, ॲनल्ड बेअर कॉपर वायर-10 कि.ग्रॅ, 20 वॅट LED ट्युबलाईट-5 नग, पॉईंट वायरींग फॉर PVC-5 पॉईंट, पॉईंट वायरींग फॉर इंडिपेंन्डेन्ट प्लग-15 पॉईंट, मॉडयुलर स्विच बॉक्स-7 नग, स्विच सॉकेट-12 पॉईंट, 2 x2.5 स्क्वे.एम. एम कॉपर वायर-110 मी, 1.5 टन वातानुकुलित यंत्राणा-2 नग, कॉपर पाईप-10 मी, कन्डयुट - 10 मी, मिनी फिडर पिलर-6 नग, एक्सेवेशन हार्ड रॉक-31 मी, फाऊंडेशन-3 नग,<br>**पार्ट-2 (सिटी मिटर पॅनल) :-** 4 x240 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-330 मी, 4 x150 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-160 मी, 3 x35 स्क्वे.एम. एम ॲल्युमिनिअम कंडक्टर-80 मी , 4 x10 स्क्वे.एम. एम कॉपर कंडक्टर-18 मी, RCC हयुम पाईप-550 मी.<br>**पार्ट-3 (अर्थिंग)**<br>बोरींग/ड्रिलींग बोअर वेल - 156 मी, अर्थिंग - 26 नग, जी.आय स्ट्रीप - 780 कि.ग्रॅ, आर.सी.सी चेंबर कव्हर - 26 नग<br>**अंदाजपत्रकीय रक्कम - 23,47,955/-** | मे.यश इंजिनिअरिंग |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने अखंडीत विज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था करणे. | **डिझेल जनित्र**<br><br>250 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग<br>**अंदाजपत्रकीय रक्कम - 20,59,895/-** | मे.यश इंजिनिअरिंग |
| 3 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने सिटी मिटर पॅनल, चेंज ओव्हर पॅनल, डिस्ट्रीब्युशन पॅनल व्यवस्था करणे | **<u>पॉवर सेक्शन (Power Section)</u>**<br>**सिटी मिटर पॅनल, चेंज ओव्हर पॅनल, डिस्ट्रीब्युशन पॅनल**<br>**पार्ट-1 (चेंज ओव्हर पॅनल) :-** जी.आय शिट-15.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-490 कि.ग्रॅ, लॉक-30 नग, 2x10 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-90 मी, 2x6 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-90 मी, लग्ज-70 नग, पॅनल मिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-1 नग, पायलेट लॅम्प-6 नग, न्युटरल लिंक-4 नग, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-70 नग, बस पट्टी व बार-168 कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-4 नग, 3 पोल MCCB 630A- 2 नग, 3 पोल MCCB 400A- 2 नग, रोट्री हॅन्डल 250A-2 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-2 सेट.<br>**पार्ट-2 (आय.सी.यु डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-** जी.आय शिट-14.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-270 कि.ग्रॅ, 4x16 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-240 मी, 4x50 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-240 मी, पायलेट लॅम्प-18 नग,बस पट्टी व बार-72 कि.ग्रॅ, 3 पोल MCCB 200A- 6 नग, FPMCB 40A ते 63A, टर्मिनल स्प्रेडर-6 सेट<br>**पार्ट-3 (ICU रुम आऊटसाईड पॅनल):-** जी.आय शिट-10.25 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-288 कि.ग्रॅ, लॉक-24 नग, 2x10 स्क्वे.एम.एम कॉपर वायर-290 मी, रोट्री हॅन्डल-24 नग, टर्मिनल स्प्रेडर-24 सेट, SPMCB- 6 ते 32A सी सिरीज-114 नग, SPMCB- 6 ते 32A बी सिरीज-114 नग, 4 पोल RCCB-48 नग,<br>**पार्ट-4 (सिटी मिटर पॅनल):-** जी.आय शिट-11 स्क्वे. मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेडर-1 सेट, 3 पोल MCCB 600A- 1 नग,<br>**पार्ट-5 (पॉईंट वायरींग) :-** पॉईंट वायरींग-160 पॉईंट, पॉईंट वायरींग फॉर इंडिपेंडेंट प्लग-30 पॉईंट, वायरींग फॉर प्लग ऑन बोर्ड-160 पॉईंट, 20 वॅट LED टयुब लाईट-80 नग, मॉडयुलर स्विच बॉक्स-80 नग, एअर सक्युलेटर-70 नग, SPMCB-6A ते 32A-110 नग<br>**पार्ट-6 (केबलिंग वर्क):-** 3x4sq.mmआर्मड केबल-1280 मी, 4x6sq.mmआर्मड केबल-1450 मी, 4x25sq.mmआर्मड केबल-380 मी, 4x10sq.mmआर्मड केबल-320 मी<br>**अंदाजपत्रकीय रक्कम - 40,36,116/-** | मे.सिध्दी इलेक्ट्रीकल्स |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वरुण इंडस्ट्री कोरोना केअर सेंटर येथील अति दक्षता विभाग (ICU Section) करिता नव्याने वातानुकुलित यंत्रणा बसविणें | **वातानुकुलित यंत्रणा**<br>2 टन वातानुकुलित यंत्रणा-30 नग, व्होल्टेज स्टॅबिलायझर-30 नग, सॉफ्ट ड्रोन कॉपर पाईप-960 मी, UPVC फ्रलॅक्झीबल कंडयुट-960 मी.<br>**अंदाजपत्रकीय रक्कम - 35,21,145/-** | मे.सिध्दी इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त कामांचे सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

वर नमुद अंदाजपत्रकानुसार येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त सो., यांनी दि.25/06/2021 रोजीचे ठराव क्र.287 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे. परंतु, सद्यस्थितीत कोरोना (कोविड-19) विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल.

तरी सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथील अति दक्षता विभागात (ICU) नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करिताअनुक्रमांक 1 ते 11 कामे करणे कामी **शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या **अंदाजपत्रकीय रक्कमेवर 5% कमी दराने** काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २९३

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २९/०६/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे इंटरनेट सुविधा पुरविणे कामी लघुत्तम दर मंजूर करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे इंटरनेट सुविधा पुरविणे कामी मा. उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या मंजुरीनुसार जाहीर दरपत्रक सुचना दि. २१/०५/२०२१ पासून ते दि. २८/०५/२०२१ रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (सी), चंदनसार, दुसरा मजला, माहिती तंत्राज्ञान विभागात मागवले असता, सदर कामाबाबत ३ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यांच्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| इंटरनेट १५ Mbps १२ Months Unlimited | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशिल | मे. डिजीटल नेटवर्क असोसिएट्स प्रा. लि | | मे. इंडीग्लो इंन्फोटेल | | मे. डि एन ए इंन्फोटेल प्रा लि. | |
| | | प्रति वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) | तीन वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) | प्रति वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) | तीन वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) | प्रति वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) | तीन वर्ष रक्कम रु (सर्व करांसहीत) |
| 1 | वैद्यकीय आरोग्य केंद्र, नारंगी, विरार (पू) | १८८००/- | ५६४००/- | १६२००/- | ४८६००/- | १३,७७१/- | ४१३१३/- |
| 2 | वैद्यकीय आरोग्य केंद्र, चंदनसार | १८८००/- | ५६४००/- | १६२००/- | ४८६००/- | १३,७७१/- | ४१३१३/- |
| 3 | जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार | १८८००/- | ५६४००/- | १६२००/- | ४८६००/- | १३,७७१/- | ४१३१३/- |
| 4 | Wi-Fi Router 300 Mbps (TP link/D link) | ( ३ नग * १५००/-) | ४५००/- | ( ३ नग * १८००/-) | ५४००/- | ( ३ नग * १५००/-) | ४५००/- |
| एकूण | | | १७३७००/- | | १५१२००/- | | **१२८४३९/-** |

वरील प्राप्त दरपत्रकांची तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दरांशी तुलना केली असता मे. डि एन ए इंन्फोटेल प्रा लि. यांच्या दरपत्रकातील दर सर्वात कमी व वाजवी असून सदरचे दर मंजूर करुन वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे तीन वर्षाकरीता इंटरनेट सुविधा सुरु करणे कामी, त्यांच्याशी करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी'- अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे तीन वर्षाकरीता इंटरनेट सुविधा पुरविणे कामी मे. डि एन ए इंन्फोटेल प्रा लि. यांचे लघुत्तम दर मंजूर करुन यांच्याशी संविदा करण्यास व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जोंभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं. -४०१ ३०५
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स -0250-2525107
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- २९४

विभाग :- मालमत्ता कर

दिनांक :- २९/०६/२०२१

विषय :- महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनीयमीत केलेला) अधिनीयम( MTOB),१९७९ नुसार कर आकारणी करणे व तो वसुल करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी नगरपरिषदा व ग्रामपंचायतमध्ये वेगवेगळया करयोगय मूल्यानुसार मालमत्ताकराची आकारणी करण्यात येत होती. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९-अ नुसार कर समानीकरण करण्याची प्रक्रीया सन २०१७-१८ साली सुरु करण्यात आली. सदर समानीकरणाची प्रक्रीया सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पूर्ण झालेली आहे.

महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ हा संपूर्ण महाराष्ट्रात दि.१२ सप्टेंबर १९७९ साली लागु करण्यात आला. या अधिनियमानुसार महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रू.१५०० पेक्षा अधिक असेल अशा मालमत्तांच्या करयोग्य मूल्यावर १०% कर लागू करण्याबाबत तरतूद देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ नुसार सन २००९ ते २०१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षांकरीता महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार केंद्रशासनाच्या लेखापरिक्षण विभागाने मनपाच्या मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण केलेले असुन त्याची आक्षेपाची प्रत दि. २७/०३/२०१९ रोजी या कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहे. सदर आक्षेपानुसार महानगरपालिकेने महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार कर लागू करणे व तो वसुल करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. असे असतानाही महानगरपालिका स्थापना झाल्यापासून अशा कराची आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या लेखा परिक्षण विभागात सन २००९ ते २०१७ या कालावधीत लेखा परिक्षण करताना रक्कम रु.३,९१,८६,०६१/-

इतक्या रक्कमेचा शासनाच्या कराचे नुकसान झालेले आहे असा आक्षेप नोंदविलेला आहे.

उक्त बाबी लक्षात घेऊन सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ अन्वये कर लागु करणेबाबत मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मालमत्ता कर समानीकरणाची प्रक्रीया सुरु असल्याने सदरचा कर लागु करणेबाबत मा. सर्वसाधरण सभेने संदर्भ क्र.२ नुसार सदर प्रस्तावास स्थगीती देवुन कर समानीकरणाची प्रक्रीया पुर्ण झाल्यावर महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग (MTOB) नुसार कर लागु करण्यात येईल. असा दि. २०/०६/२०१९ रोजी ठराव पारीत केला.

महानगरपालिका हद्दीतील समानीकरणाची प्रक्रीया ही सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पुर्ण झालेली आहे. मा. राज्यशासनाकडून संदर्भ क्र. २,३ व ४ नुसार महानगरपालिकेस वारंवार महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग नुसार केलेल्या कर आकारणीचा अहवाल मागविण्यात येत आहे. व सदर करातून प्राप्त होणारे उत्पन्न राज्य शासनास वळते करणेबाबत निर्देशीत करण्यात येत आहे. सदर कराची अपेक्षीत रक्कम संबंधीतांना लागु करुन त्यांच्याकडुन वसुल करुन घेऊन वसुल करण्यात आलेली रक्कम मा. राज्यशासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ चे कलम १५ अन्वये सदरची रक्कम पालीकेच्या बँकेत असलेल्या खात्यातुन परस्पर वळती करुन घेण्याची तरतुद नमुद आहे. सदर बाबींचा विचार करता शहरात महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार तसे न केल्यास कलम १५ अन्वये सदरची रक्कम पालिकेच्या बँकेत असलेल्या खात्यातून परस्पर वळती करुन घेण्याची तरतूद नमूद आहे.

सदर बाबीचा विचार करता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत उक्त कर लागू करणे व वसुल करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार करपात्र मालमत्तांची माहिती खालील प्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रू.१५०० पेक्षा अधिक असेल अशा मालमत्तांची संख्या | ४६९९ |
| २. | करयोग्य मूल्यावर १०% रक्कम | रू.१,१४,२९,४१७/- |

कर आकारणी न केल्यास प्रतीवर्षी आक्षेपानूसार रक्कमेत वाढ होवून शासन पालिकेच्या तिजोरीतून सदरची रक्कम वळती करुन घेतल्यास पालिकेचे

करोडो रूपयांचे आर्थिक नुकसान होईल. याचा परिणाम पालिकेच्या विकास कामांवर होईल. करीता शहरातील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रू.१५०० पेक्षा अधिक असेल अशा इतारतींवर करयोग्य मुल्याच्या १०% कर लागू करणे व वसुल करणे करिता मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :-** महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनीयमीत केलेल्या) अधिनीयम (MTOB),१९७९ नुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ज्या निवासी मालमत्तेचे तळक्षेत्र १५० चौरस मिटर पेक्षा अधिक असेल आणि तिचे कर योग्य मूल्य पंधराशे रूपयांपेक्षा अधिक असेल अशा मालमत्तेच्या करयोग्य मुल्याच्या १०% कर सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासुन लागु करणे व तो वसुल करणेबाबतची प्रशासकीय मंजुरी देणेत येत आहे.

प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** २९५

विभाग :- पाणी पुरवठा

दिनांक :- २९/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे कामी संविदा करणेबाबत.**

वसई – विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ व ३ अंतर्गत २०० द.ल.ली पाणी पुरवठा होत असुन धुकटण येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर केंद्रामध्ये येणाऱ्या अशुध्द पाण्यास ॲलम व क्लोरीन ची डोसिंग करण्यात येऊन क्लॅरिफ्लॉक्युलेटरमध्ये सदरचे पाणी Settle करण्यात येते. Settle Water Filter करण्यात येऊन शहरास शुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो.

धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामध्ये जुन्या योजनेअंतर्गत ५ ML क्षमतेचे २ क्लॅरिफ्लॉक्युलेटर व नवीन योजनेअंतर्गत ६ ML क्षमतेचे २ असे एकूण ४ क्लॅरिफ्लॉक्युलेटर टँक आहेत. सदरच्या टँक मध्ये ॲलमच्या Dosing मुळे ॲलम मिश्रीत गाळ जमा होतो. सदरचा गाळ जास्त जमा झाल्यास CLF Bridge ला फिरण्याकरीता अडथळा येतो. तसेच पावसाळा जवळ आला असुन सदरचा गाळ साफ न केल्यास पावसाळयामध्ये अशुध्द पाणी Settle होण्यास अडथळे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळयापुर्वी CLF टँक साफ करणे आवश्यक आहे.

सदर कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९.९० लक्ष खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. २२१ दि. १४/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त आहे. सद्य:स्थितीत पावसाळा सुरु झाला असुन CLF टँक मध्ये मोठया प्रमाणात गाळ असल्याने Bridge फिरण्यास अडचण निर्माण होत आहे व Bridge न फिरल्याने पाणी Settle होण्यास विलंब लागत आहे. त्यामुळे सुर्या योजनेच्या चारही ही CLF टँकची तातडीने साफ सफाई करणे आवश्यक आहे.

या अगोदरही मे. ॲशलॉन एंन्टरप्राईसेस यांचे कडून CLF टँकची साफ सफाईची कामे करुन घेण्यात आली आहेत. त्यामुळे मे. ॲशलॉन एंन्टरप्राईसेस यांस मार्फत सदरचे काम करुन घेतल्यास महानगरपालिकेची होणारी संभाव्य गैरसोय टाळता येणे शक्य आहे.

वसई - विरार महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची – ड, प्रकरण - ५, संविदा २ (२) नुसार निविदा न मागविता अंदाजपत्रकानुसार मे. ॲशलॉन एंन्टरप्राईसेस यास समवेत संविदा करुन कार्यादेश देण्यास व त्याअनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव** :- वसई - विरार महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची – ड, प्रकरण - ५, संविदा २ (२) अंदाजपत्रकानुसार निविदा न मागविता मे. ॲशलॉन एंन्टरप्राईसेस, वसई (प.) यांस समवेत संविदा करुन कार्यादेश देण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

29/6

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जि-पालघर,पिन नं.-४०१३०५**
**दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६,फॅक्स-०२५०-२५२५१०७**

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- २९६

विभाग :- वाहन
दिनांक :- २९/६/२०२१

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या ९ नग बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७T वाहनावर बॉडी बांधणेकामी कमी दराचे दरपत्रक मंजूर करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर**:- वसई-विरार शहर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या ९ नग बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७T या वाहनावर बॉडी बांधणेकामी संदर्भ क्र. अन्वये प्रशासकिय मंजूरी घेऊन जा.क्र.वविशम/वाहन/१४९/२०२१, दि.१८/०६/२०२१ रोजी जाहीर दरपत्रक http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.२५/०६/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत इच्छुक पुरवठा दाराकडुन दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात आले होते. सदर मुदतीत एकुण ०३ दरपत्रके प्राप्त झाली.

प्राप्त ३ दरपत्रकातील दरांची तुलनात्मक पडताळणी केली असता दरपत्रक खालीलप्रमाणे :-

मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल - रु. ३१,९२०/-
मे. एन. सी. मोटर्स - रु. ३२,४८०/-
मे. चिराग एंटरप्रायजेस - रु.३१,३६०/-

प्राप्त ३ दरपत्रकामधील दरांचा तुलनात्मक तक्तासोबत जोडला आहे. कमी दराचे दरपत्रकामधील दर बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता योग्य व वाजवी आहेत. तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या ९ नग बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७T या वाहनावर बॉडी बांधणेकामी दरपत्रकामधील मे. चिराग एंटरप्रायजेस यांचे र.रु. ३१,३६०/- प्रमाणे ०९ वाहनांसाठी २,८२,२४०/- इतक्या कमी दराचे दरपत्रक मंजूर करुन त्यांचे समवेत संविदा करणेस प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या 9 नग बोलेरो पिकअप BS-VI PS, 1.7T वाहनावर बॉडी बांधणेकामी मे. चिराग एंटरप्रायजेस यांचे कमी दराचे रु.३१,३६०/- प्रमाणे ९ वाहनांसाठी र.रु.२,८२,२४०/- चे प्राप्त झालेल्या दरपत्रकास व त्यांचे समवेत संविदा करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**